## रे. दि. मु. नं.३६५/२००० मधील नि.१७५ वरील आदेश
## (श्री. रघुनाथ चव्हाण वगैरे विरुध्द भिमराव कांबळे वगैरे )
**CNR NO.MHSN05-000116-2000**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

वादी यांचे पूर्वहक्कदार नाना रावजी चव्हाण यांचेसह ज्ञानू रावजी चव्हाण रामा रावजी चव्हाण, पांडू रावजी चव्हाण, खंडू रावजी चव्हाण यांनी श्री. लक्ष्मण विठ्ठल कुलकर्णी रा. ऐतवडेखुर्द यांचेकडून दि. १/१२/१९५६ रोजी दावा मिळकतीचा मूळ सर्वे नं. ४३ क्षेत्र २१ एकर ३८ गुंठे या मिळकतीमधील ८ आणे हिस्सा नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी घेतलेला आहे. वादीचे पूर्वहक्कदार नाना रावजी चव्हाण यांचे सर्व वारसांनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. सदरचा दावा न्यायप्रविष्ट असताना वादी नं. ७, प्रतिवादी नं. ८, ९, १९ व २० हे मयत झालेले आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी सदरचा दावा न्यायप्रविष्ट असताना त्यांच्या मालकीचा हिस्सा पूर्णपणे विक्री केलेला असून खरेदीदाराना दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. तसेच वादी नं. ७ व प्रतिवादी नं. ८, ९, १९ व २० यांचे वारसाबाबत पूर्तता करणे आवश्यक असलेने दावा दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर दुरुस्ती केलेस वादी व प्रतिवादी यांचेतील वादाचे कायदेशीर निराकरण होणार आहे. तसेच मूळ दाव्याच्या स्वरुपात सदरच्या दुरुस्तीमुळे कोणताही बदल होत नाही. उलट दावा निर्गत करणेस सोयीचे होणार आहे.

३. प्रतिवादी यांना वेळोवेळी संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल न केलेने दि. १८/०९/२०१८ रोजी त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश

करणेत आला.

**४.** अर्ज वाचला वादीतर्फे सुविद्य विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत अर्जातील कथनांवरुन असे दिसून येते की, प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी सदरचा दावा न्यायप्रविष्ट असताना त्यांच्या मालकीचा असलेला हिस्सा पूर्णपणे विक्री केलेला असून खरेदीदारांना दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादींनी ती खरेदीपत्रे दाखल केलेली आहेत. सदरची खरेदीपत्रे दि. २७/०७/२००१ रोजी करण्यात आलेली आहेत. परंतु प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी दि. २८/०८/२०१८ एवढया प्रदीर्घ कालावधीनंतर दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज कॉस्टवर मंजूर करणे आवश्यक आहे. तसेच वादी नं. ७, प्रतिवादी नं. ८, ९, १९ व २० दावा प्रलंबित असताना मयत झालेले आहेत. त्यामुळे त्याबाबत आवश्यक ती पूर्तता करणे गरजेचे आहे.

**६.** वादींनी मागितलेली दुरुस्ती केल्यास दावा गुणांणुगुणांवर चालण्यास मदत होणार आहे व वादी, प्रतिवादींमधील वाद अंतिमरित्या संपुष्टात येणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा नि.१७५ चा अर्ज कॉस्टवर मंजूर करणेत येतो.
२. वादीने कॉस्टची रक्कम रुपये २००/–विधी सेवा प्राधिकरण, इस्लामपूर यांचेकडे जमा करावी.
३. वादीने १४ दिवसांमध्ये दुरुस्ती करुन योग्य ती पूर्तता करावी.

Sanyogita Subhashrao Deshmukh
Digitally signed by Sanyogita Subhashrao Deshmukh
Date: 2019.08.02 17:07:22 +05'30'

इस्लामपूर. (श्रीमती. एस. एस. देशमुख )
दिनांक – ३१/०७/२०१९ ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
इस्लामपूर.

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shri. M. S. Gondkar |
| Court Name | :- | Smt. S. S. Deshmukh,<br>7th Jt. Civil Judge (J.D.) and<br>J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 31/07/2019 |
| Order signed by PO. on | :- | 01/08/2019 |
| Order uploaded on | :- | 02/08/2019 |